**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस/ उमेदवारांच्या माघारीनंतर लढतींचं चित्र होणार स्पष्ट

- महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली/ कार्यभार मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे

- झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी प्रधानमंत्र्यांच्या आज दोन प्रचारसभा

- अमेरिकेत उद्या अध्यक्षपदासाठी मतदान

**आणि**

- उत्तराखंडमधे अल्मोडा इथं बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३६ जणांचा मृत्यू- मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

**<><><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. राज्यातल्या २८८ मतदारसंघांमध्ये सात हजार ६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. मात्र यापैकी किती उमेदवार माघार घेतात आणि किती उमेदवारी निवडणूक रिंगणात कायम राहतात, हे आज सायंकाळनंतरच स्पष्ट होईल.

राज्यात मराठवाड्यातल्या ४६ मतदारसंघांमध्ये सर्वाधिक उमेदवार आहेत, यामध्ये नांदेड जिल्ह्यातल्या भोकर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे १४० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्या खालोखाल बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात ९८, तर बीड विधानसभा मतदार संघात ९० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे फक्त पाच उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबईत चेंबूर, माहिम आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या सावंतवाडी मतदारसंघात प्रत्येकी सहा, तर शिवडी आणि कुडाळमध्ये प्रत्येकी सात उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

राज्यातल्या एकूण हालचालींविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

.... **व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे**

*नवीन विधानसभेसाठी राज्यात या महिन्याच्या २० तारखेला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. प्रामुख्याने, सत्ताधारी महायुती आणि विरोधक महाविकास आघाडी या प्रमुख आघाड्यांमध्ये सत्तेसाठी चुरस दिसून येत आहे. असं असलं तरी, काही छोटे पक्ष आणि अपक्ष देखील निवडणूक रिंगणात आहेत. मोठ्या पक्षातून उमेदवारी न मिळल्यामुळे अपक्ष म्हणून अर्ज भरणारे नाराज उमेदवार काय करतात याकडे सर्वांचं लक्ष आहे. मराठा आरक्षण आंदोलन कर्ते मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना त्यांनी अर्ज मागे घेण्याचं आवाहन केलं आहे. कोणताही उमेदवार उभा राहणार नसल्याचं ते म्हणाले. मात्र आरक्षणासाठीं आंदोलन पुढं सुरुच राहील असं जरांगे यांनी आज सकाळी वार्ताहरांना सांगितलं.*

*मुंबईत महायुतीच्या विशेषतः शिवसेनेच्या विरोधातले उमेदवार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं मागे घेतले तर माहिम विधानसभा मतदारसंघातून माघार घेण्याची तयारी शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर यांनी दर्शविली आहे. मात्र, असा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी मतदारसंघातील आपले सहकारी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करणार असल्याचंही सरवणकरांनी स्पष्ट केलं.*

*बोरिवली विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणारे भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली*

*आहे. बोरीवलीत भाजपने संजय उपाध्याय यांना उमेदवारी घोषित केल्यानंतर गोपाळ शेट्टी यांनी बंड करत अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला होता. भाजपने बोरीवलीत बाहेरचा उमेदवार दिल्याचा त्यांचा आक्षेप होता. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याबरोबर चर्चा झाल्यानंतर शेट्टी यांनी निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली.*

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश दिले आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. रिक्त झालेल्या पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. नवीन महासंचालकांच्या नियुक्तीसाठी तीन आयपीएस अधिकाऱ्यांची समिती येत्या ५ नोव्हेंबरपर्यंत नेमण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य सचिवांना देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाच्या या आदेशाचं काँग्रेसने स्वागत केलं आहे. महाराष्ट्रातली विधानसभा निवडणूक पारदर्शक पद्धतीने होऊ नये, म्हणून सरकारने त्यांना मुदतवाढ दिली होती, हे आज स्पष्ट झालं, अशी प्रतिक्रिया विधानसभेतले विरोधी पक्षेनेते विजय वडेट्टीवार यांनी समाज माध्यमावर दिली आहे.

**<><><><><>**

रश्मी शुक्ला यांच्या कार्यकाळाला मुदतवाढ देण्यावरून नाना पटोले यांनी देवेंद्र फडणवीसांवर बेछूट आरोप केले. मात्र, त्याचे पुरावे नसतील तर आज नाना पटोले यांच्या विरुद्ध निवडणूक आयोगाकडे तक्रार करू, असं भाजपाचे आमदार आणि मुंबई शहर अध्यक्ष आशिष शेलार यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

<><><><><><>

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ८ ते १४ नोव्हेंबर दरम्यान ११ सभा घेणार आहेत धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चंद्रपूर, चिमूर, सोलापूर, पुणे छत्रपती संभाजीनगर नवी मुंबई आणि मुंबई इथं या सभा होतील, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

<><><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नागपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांसाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दोन प्रचारसभा घेत आहेत. झारखंड मुक्ती मोर्चाचं सरकार विकासात खोडा घालत असल्याचा आरोप गढवा इथल्या सभेत मोदी यांनी केला. विधानसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर झारखंडमध्ये मोदींची ही पहिलीच निवडणूक प्रचार सभा आहे. चाईबासा इथं दुसरी सभा होणार असल्याची माहिती, झारखंड भाजपचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री बाबूलाल मरांडी यांनी दिली आहे. झारखंडमधे १३ आणि २० नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात मतदान होणार आहे.

<><><><><><>

अमेरिकेच्या ४७व्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रेटिक पक्षाच्या नेत्या कमला हॅरिस यांच्यात ही लढत होईल. या दोघांनीही निवडणुकीत निर्णायक ठरणाऱ्या राज्यांमध्ये जोरदार प्रचार केला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवाराला २७० इलेक्टोरल कॉलेज मतांची आवश्यकता असते. ॲरिझोना, नेव्हाडा, विस्कॉन्सिन, मिशिगन, पेनसिल्विनिया, नॉर्थ कॅरोलिना आणि जॉर्जिया या राज्यांमधल्या निकालांनंतरच चित्र स्पष्ट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

<><><><><><>

उत्तराखंडमधल्या अल्मोडा जिल्ह्यात आज एक बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३६ जणांचा मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले आहेत. ही बस गौलीखलहून रामनगरच्या दिशेने जात असताना अल्मोडामधल्या कुपी गावाजवळ २०० मीटर खोल दरीत कोसळली. या बसमध्ये ५१ प्रवासी होते. पोलीस आणि एसडीआरएफच्या पथकांनी अपघातस्थळावर युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केलं असून गंभीर जखमींना एअरलिफ्ट करून हृषिकेश इथल्या एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघाताविषयी तीव्र शोक व्यक्त केला आहे. अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री साहाय्यता निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांचं अर्थसाहाय्य मिळणार आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या दुर्घटनेविषयी तीव्र शोक व्यक्त केला असून बचाव कार्य वेगानं करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसंच, मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख तर जखमींना १ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणाही धामी यांनी केली आहे. तसंच, या अपघाताची चौकशी करण्याचे आदेश कुमाउं विभागाच्या आयुक्तांना देण्यात आले

असून पौरी आणि अल्मोडा या भागातल्या वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश धामी यांनी दिले आहेत.

<><><><><>

भारताने २०१५ ते २०२३ या आठ वर्षांच्या कालावधीत देशातील क्षयरोगाचं प्रमाण सुमारे १७ टक्क्यांनी कमी करण्यात यश मिळवलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, क्षयरोगाचा प्रसार कमी करण्यासाठी देशाने केलेल्या प्रयत्नांचं कौतुक केलं आहे. 'क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये झालेली घट हे भारताच्या समर्पित आणि अभिनव प्रयत्नांचे फलित आहे. सामूहिक भावनेच्या माध्यमातून, आपण क्षयरोगमुक्त भारतासाठी कार्य करत राहू.' असं प्रधानमंत्र्यांनी समाजमध्यमांवरील संदेशांत म्हंटलं आहे.

<><><><><>

भारताने ९० गिगावॅट अक्षय ऊर्जा निर्माण करून वर्ष २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अक्षय ऊर्जा निर्माण करण्याच्या उद्दिष्टामधला महत्वाचा टप्पा पार केला आहे, असं नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या सातव्या सत्राच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. सरकारने ३७ पूर्णांक ५ गिगावॅट क्षमतेच्या ५० सौर उद्यानांना मंजुरी दिली आहे. यावर्षी जागतिक सौर क्षेत्र अंदाजे दोन टेरावॅट क्षमतेपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, असंही ते यावेळी म्हणाले.

//<><><><><>//